2022-23

आदिवासी साहित्य, संस्कृती आणि अस्मितेचे प्रतीक

ISSN 2319-6033

१५ मे-जून २०२३
वर्ष-१६ वे, अंक ६ व ७
किंमत रू. २५/-
पृष्ठे - २८ पृ. ७८

पडघवी

(मासिक)



कुलगुरू डॉ. मधुकरजी पाडवी यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदिवासी साहित्य पुरस्कार स्वीकारताना कवी प्रवीण पवार



कुलगुरू डॉ. मधुकरजी पाडवी यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदिवासी साहित्य पुरस्कार स्वीकारताना डॉ. सोनू लांडे यांच्या वतीने प्रा. विजय कामडी

मुख्य संपादक –
डॉ. संजय लोहकरे

सहसंपादक –
डॉ. मारूती आढळ डॉ. सोनू लांडे

उप संपादक –
प्रा. रामदास गिळंदे मा. संजय इदे

कार्यकारी संपादक –
प्रा. चिंतामण धिंदळे डॉ. सुनील घनकुटे

प्रसिद्धी –
देवराम आढळ सुनील फलके
पंकज इरनक डॉ. विष्णू बोरसे

संपादक मंडळ –
तुकाराम धांडे कृष्णा साबळे
कैलास धिंदळे देवदत्त चौधरी
अभिजित करवंदे सीता भोजने
मेजर विठ्ठल बांगर रोहिदास डगळे
रोशन जांबू अभिमन्यू दारशिंबे

अक्षरजुळवणी –
सरिता ग्राफिक्स अॅण्ड प्रिंटर्स,
अमरावती

प्रकाशन स्थळ / पत्र व्यवहार –
संपादक – डॉ. संजय यशवंत लोहकरे
निरगुडेवाडी (विठे) ४२२ ६०४
ता. अकोले, जि.अहमदनगर
संपर्क: ९६५७५४९०७६, ९४०४९७९६८३
ई–मेल : phadki@rediffmail.com
(मासिकातील लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही)

अनुक्रमणिका

संपादकीय – एक ०४

संपादकीय – दोन ०६

आदिवासी साहित्य, संस्कृति एवं सद्य:स्थिती
डॉ. मधुकरजी पाडवी १२

माती (कविता)
कवयित्री – सूरसृजन १६

आदिवासी साहित्याचे विद्यापीठीय संशोधन
प्रो. डॉ. ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर १७

आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक लोकजाणिवा
डॉ. एकनाथ आहेर २१

ग्रामीण साहित्य संमेलन, इगतपुरी
अध्यक्षीय भाषण – तुकाराम धांडे २५

वर्गणीचे दर

वार्षिक :– ३०० रू., दशवार्षिक :–२५०० रू.
आजिव :– ५००० रू.
संपादकीय पत्त्यावर मनीऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
'फडकी' (Fadaki) या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.
बँक ट्रान्स्फरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, अकोले, जि. अहमदनगर
बचत खात्याचे नाव :– फडकी (Fadaki)
बचत खाते क्र. :– 60307966854
IFSC Code :- MAHB0001641
MICR No. :- 422014502

आदिवासी साहित्याचे विद्यापीठीय संशोधन

प्रो. डॉ. ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर, घोडेगाव जि. पुणे

प्रास्ताविक –

या शोधनिबंधात महाराष्ट्रातील विविध अकृषी विद्यापीठात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी प्रबंधलेखक, अभ्यासक, संशोधकांनी केलेल्या विद्यापीठीय संशोधन अभ्यासाच्या अनुषंगाने काही एक स्थूल विचार मांडण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ इ. विद्यापीठांत कला व ललित कला विद्याशाखेत अनेकांनी आदिवासी साहित्यावर संशोधन केलेले आहे. आदिवासी साहित्यावरील हे संशोधन विद्यापीठ मान्य, समाजमान्य, अभ्यासक, समीक्षकांनी त्याला मान्यता दिली आहे. प्रोत्साहन व स्वागतशीलतेची भूमिका या संदर्भात दिसते.

विद्यापीठीय क्षेत्रातील आदिवासी साहित्य संशोधनाचे स्वरूप हे सामान्यतः भाषिक अभ्यास, आदिवासी लोकसाहित्य व लोकसंस्कृती आणि लोकपरंपरा, आर्थिक व सामाजिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक, भाषा, सामाजिक परिवर्तन, आदिवासी कला, आदिवासी विषयक विविध नियतकालिके (साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, द्वैमासिके, त्रैमासिके, शण्मासिके, वार्षिक अंक, विशेषांक, स्मरणिका इ.) समग्र आदिवासी जीवन, समाज, साहित्य, संस्कृती, विविध वाङ्मय प्रकाराच्या अनुषंगाने विशेषतः आदिवासी कथा, कविता, कादंबरी, चरित्र, स्वकथन, नाटक, वैचारिक निबंध, ललितगद्य, संशोधन विषयक इ. ची जाणीवपूर्वक निवड अभ्यासकांनी केलेली आहे.

या अभ्यासक, संशोधकांमध्ये विशेषतः अनिल सहस्त्रबुध्दे, विनायक तुमराम, भाऊराव मांडवकर, जनार्दन रानडे, अलका हिवाळे, पंडित शिंदे, अरूणा घोगरे, सुधाकर चव्हाण इ. नी इ. स. २००० पूर्वीच्या काळात आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, भाषिक, ललित, लोकसाहित्य विषयक, आदिवासी कला इ. विषयांची निवड करून आपल्या अभ्यास, संशोधन, चिंतनाच्या द्वारे आदिवासी साहित्याला विद्यापीठीय संशोधन क्षेत्रात नावलौकिक मिळवून दिला. या सर्व अभ्यासातून आदिवासी कोण, आदिवासी जमाती, आदिवासींचे अस्तित्व, आदिवासींच्या परंपरा, आदिवासींची अस्मिता, आदिवासींच्या विविध समस्या इ. मराठी साहित्य संशोधनाच्या पटलावर अधोरेखित केले आहे. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात या सर्वच अभ्यासक, संशोधकांनी संशोधनाची शिस्त बाळगून आदिवासींचे वस्तुनिष्ठपणे, तटस्थपणे विश्लेषण केले आहे. या अभ्यासामुळे महाविद्यालय व विद्यापीठ पातळीवर पदवी व पदव्युत्तर स्तरावर नेमलेल्या आदिवासी साहित्यविषयक अभ्यासपत्रिका, विविध चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा, आदिवासी साहित्यसंमेलने, आदिवासी साहित्य मेळावा, तसेच अध्यापन, अध्ययन व संशोधन क्षेत्रात आदिवासी साहित्याचा बोलबाला झाला. यामुळेच २१ व्या शतकाच्या पहिल्या २२ वर्षात आदिवासी साहित्याकडे नवोदित अभ्यासक, संशोधक, प्रबंधलेखकांचे लक्ष आकर्षित झाले. यातूनच आदिवासी साहित्याचा अभ्यास, संशोधन करणारा एक वर्ग उदयाला आला.

केवळ नोकरीतील बढती, आर्थिक फायदे, मान-सन्मान म्हणून या वर्गाने अभ्यास केला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात जन्म घेतलेल्या या नवोदित अभ्यासक, संशोधक, प्रबंधलेखकावर उच्च शिक्षण घेत असताना वरील अभ्यासक, संशोधकांच्या अभ्यास-संशोधन कार्याचा प्रभाव होता. याशिवाय दलित चळवळ आणि दलित साहित्य, ग्रामीण चळवळ आणि ग्रामीण साहित्य, कामगार चळवळ आणि कामगार साहित्य, जन साहित्याची चळवळ, विज्ञान साहित्य, स्त्रीवादी साहित्य, भटक्या-विमुक्तांची साहित्य चळवळ, एकूणच उपेक्षित वंचिताची साहित्यनिर्मिती आणि चळवळ इ. सर्वांमधून महाराष्ट्रात एक वाङ्मयीन, सांस्कृतिक, वैचारिक मंथन झाले. परिणामी या नवोदित अभ्यासक, संशोधकांवर सामाजिक परिशीलनाचे, परिवर्तनाचे संस्कार झाले. यामुळेच केवळ सहानुभूती म्हणून नव्हे, तर आस्थेवाईकपणे, जाणीवपूर्वक हा नवोदित वर्ग आदिवासी साहित्य संशोधनाकडे आकर्षित झाला.

इ. स. २००० ते २०२२ पर्यंतच्या काळात आदिवासी साहित्याचे विद्यापीठीय अभ्यास संशोधन करणाऱ्यांमध्ये डॉ. माहेश्वरी गावित, डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. राजेंद्र ठाकरे, डॉ. विनोद कुमरे, डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, डॉ. अजय खडसे, डॉ. सुनील पखाले, डॉ. संजय लोहकरे, डॉ. उल्का शेवकर, डॉ. अमोल वाघमारे, डॉ. सखाराम डाखोरे, डॉ. विठ्ठल केदारी, डॉ. विक्रम जाधव, डॉ. विजय काळे, डॉ. काशिनाथ बऱ्हाटे (कोरकू बोली वर्णनात्मक आणि समाजभाषा वैज्ञानिक अभ्यास), डॉ. सोनाली लोकडे (आदिवासी मराठी कादंबरीतील स्त्रीचित्रणाचा विवेचक अभ्यास), डॉ. रमेश शिंदे (आदिवासी कवितेतील समाज जीवनदर्शन), डॉ. ज्योती झाल्टे (मराठवाड्यातील प्रमुख आदिवासी जमाती व त्यांच्या बोली), डॉ. वर्षा बिलोलीकर (१९८० नंतरच्या मराठी आदिवासी कथात्म साहित्यातील स्त्रीचित्रण), डॉ. अमोल बन (नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील भाषाशैली), डॉ. राजू मोतेराव (गोंडी आणि कोलामी लोकगीतांचा तौलनिक अभ्यास), डॉ. रामकिसन चाटे (महाराष्ट्र - आंध्र सीमाभागातील आदिवासी जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास), डॉ. मधुचंद्र भुसारे (कोकणा जमातीच्या बोलींचा अभ्यास), डॉ. राजेश धनजकर (मराठवाड्यातील आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास), डॉ. सखाराम डाखोरे (मराठी व हिंदीतील आदिवासी कवितेचा तौलनिक अभ्यास), डॉ. विकास बहुले (आदिवासी जीवनावरील मराठी नाटके - आकलन आणि मूल्यमापन), डॉ. सुनील घनकुटे (महाराष्ट्रातील आदिवासी दुबळा जमातीचे लोकसाहित्य), डॉ. हनुमंत भवारी (आदिवासी स्त्रियांनी केलेले लेखन), डॉ. मंगेश अटकोरे (मराठी आदिवासी आत्मकथनांचा विवेचक अभ्यास), डॉ. मुक्ता आंभेरे (मराठी कादंबरीतील आदिवासी स्त्री चित्रण - १९४५ ते २०१०), डॉ. विक्रम जाधव (आदिवासींचे जीवनचित्रण करणारी मराठी कादंबरी - १९६० ते २००७), डॉ. विठ्ठल केदारी, (आदिवासी मराठी आत्मकथन व चरित्रांचा सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन अभ्यास), डॉ. राजेंद्र ठाकरे (आदिवासी मराठी कवितेचा चिकित्सक अभ्यास), डॉ. पुष्पा गावित (धुळे जिल्ह्यातील आदिवासी बोली भाषांचा तौलनिक अभ्यास), डॉ. प्रकाश साळुंखे (अक्कलकुवा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीचे लोकसाहित्य आणि लोकपंरपरा आणि लोकगीतांचा अभ्यास), डॉ. संजय महाले (नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भिल्ल जमातीच्या लोकसाहित्याचा वाङ्मयीन अभ्यास), डॉ. हेमराज बिरारीस (साक्री तालुक्यातील आदिवासी

कोकणा जमातीच्या लोकवाङ्मयाचा लोकसांस्कृतिक अभ्यास), डॉ. बाळू घुटे (आदिवासी जीवनशैली आणि मौखिक वाङ्.मय एक अभ्यास – पेठ तालुक्याच्या संदर्भात), डॉ. सुलतान पवार (आदिवासी मराठी कादंबरी वाङ्मयातील लोकसंस्कृती आणि लोकभाषेचा चिकित्सक अभ्यास), डॉ. योगेश महाले (मराठी कादंबरी : आदिवासी जीवनचित्रणाचा अभ्यास), डॉ. अनिलकुमार पगारे (कोकणा जमातीच्या बोलीचा अभ्यास), डॉ. महेंद्र गावित (धुळे आणि नंदुरबार जिल्हयातील मावची लोकसाहित्याचा अभ्यास), डॉ. विलास गावित (आदिवासी लेखिकांच्या ललित साहित्यातून प्रकाशित आदिवासी जाणिवांचा अभ्यास), डॉ. महादू बागूल (नाशिक जिल्हयातील लोकसाहित्याचा अभ्यास – विशेषतः कोकणा, भिल्ल, वारली), सुंदर पाडवी (आदिवासी आणि आदिवासीएतर लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधील आदिवासी जीवनचित्रणाचा तुलनात्मक अभ्यास – अभ्यास चालू आहे), गंगाधर चेपूरवार (माधव सरकुंडे यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास) (प्रस्तावित), प्रा. संदिप चपटे (गोविंद गारे यांच्या साहित्याचा समग्र अभ्यास), श्री. विशाल साळवे (अधिकारी माणूस या आत्मकथनाचा अभ्यास), आदींनी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठात प्रबंधिका लेखन व शोधप्रबंधलेखनाचे काम पूर्ण केलेले आहे. काही निवडक अभ्यासकांचे विविध विद्यापीठातील संशोधन कार्यरत आहे. यातील अनेकांचे शोधप्रबंध महाराष्ट्रातील नामवंत प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित होऊन विद्वत जणांची मान्यता आणि पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत.

विद्यापीठीय शोधप्रबंध लेखनाबद्दल या साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, 'पाश्चात्य आणि ऐतद्देशीय लोकांनी कोणत्याही उद्देशाने का असेना, हे त्यांचे कार्य येणाऱ्या आदिवासी पिढ्यांसाठी मूलभूत आणि दिशादर्शक आहे, हे मान्य केलेच पाहिजे. '(पृ. ३६०) आदिवासी साहित्याच्या अभ्यास – संशोधन – शोधप्रबंध लेखनामुळे आदिवासी साहित्य म्हणजे काय? या साहित्याचे प्रयोजन, भूमिका, समाजाभिमुखता, जीवनवादी दृष्टीकोन, स्वरूप आणि सिध्दांत कोणते हे परिचित झाले आहे. या साहित्याची दिशा काय? व्याप्ती, जाणिवा, प्रेरणा, प्रवृत्ती कोणत्या हे अधोरेखित झाले. या साहित्याच्या भवितव्याबद्दल वाङ्मयीन वैचारिक मंथन झाले.

महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये या साहित्यावर झालेले संशोधन परिपूर्ण झालेले आहे, असे म्हणता येणार नाही. अजूनही नव्या अभ्यासक, संशोधकांना संशोधन करण्याची भरपूर संधी आहे.

विशेषतः या साहित्याचे सिध्दांत, सौंदर्यशास्त्र, समीक्षाशास्त्र, भाषाशास्त्र, आदिम कलातत्व, आदिवासी धर्म, सांस्कृतिक भावविश्व, जागतिकीकरणातील आदिवासी, आदिवासी साहित्य आणि तंत्रज्ञान, कोरोना महामारी आणि आदिवासी साहित्य इ. अनेक विषयांची चर्चा – वैचारिक मंथन बाकी आहे. याशिवाय आदिवासींचे वैचारिक वाङ्मय, ललितगद्य लेखन, संकलन, प्रवासवर्णन, बोलीभाषा व आदिवासी बोलींच्या अध्ययन – अध्यापनातील अडथळे इ. अनेक विषय अजून शिल्लक आहेत.

या शोधनिबंधात महाराष्ट्रातील विविध अकृषी विद्यापीठात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) यासाठी प्रबंधलेखक, अभ्यासक संशोधकांनी केलेल्या विद्यापीठीय संशोधन अभ्यासाच्या अनुषंगाने काही एक स्थूल विचार मांडण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे. तो या ठिकाणी परिपूर्ण आहे असे वाटत नाही. यात

काही संशोधकांचे व अभ्यासकांचे उल्लेख करणे राहून गेले असल्यास त्या अभ्यासकांची मी क्षमा मागतो. या बाबत मला कल्पना दिल्यास मी पुढील नवीन लेखात त्यांचा नक्कीच समावेश करून हा शोधनिबंध परिपूर्ण करेल.

निरीक्षणे –

१) आदिवासी आणि बिगर आदिवासी अभ्यासक–संशोधकांकडून झालेले संशोधन मूलभूत विषयांची चर्चा करणारे आहे.

२) समाजमनस्क, सहृदयतेने संशोधनाचे काम झालेले आहे.

३) यात वस्तुनिष्ठता, तटस्थपणा आहे, भावनिकतेचा स्पर्श नाही.

४) विश्लेषण, संश्लेषणाची भूमिका त्यातून सिध्द होते.

५) अभ्यास – संशोधनाची एक काटेकोर शिस्त, संशोधन पध्दतीचा अवलंब झालेला आहे.

६) या प्रकारच्या संशोधनातून नव्या पिढीला आश्वासक बळ, प्रोत्साहन व प्रेरणा मिळेल.

संदर्भ :–

१) तुमराम, विनायक, 'आदिवासी साहित्य – दिशा आणि दर्शन' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १५ नोव्हेंबर २०१२, पृ. २९२.

२) गावित, माहेश्वरी, 'महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे प्र. आ. २००८ पृ. ७७.

३) जाधव, रा. ग व इतर (संपा) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्र. आ. मे. २००९ पृ. ३६०.

४) वाल्हेकर, ज्ञानेश्वर, 'आदिवासी साहित्य – एक अभ्यास' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १५ ऑगस्ट २००९.

५. या लेखासाठी डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. सखाराम डाखोरे, डॉ. हनुमंत भवारी, डॉ. योगेश महाले, डॉ. मधुचंद्र भुसारे इ. शी फोनवर चर्चा झालेली आहे.

--**--

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती पदवी मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..!



डॉ. एकनाथ आहेर

–: संशोधन विषय :–

मराठी कथा आणि आदिवासी समाजजीवन : एक अभ्यास

मु. भवानदगड, पो. सतखांब, ता.सुरगाणा, जि. नाशिक–४२२२११